www.newsdanka.com

राष्ट्रवादाचा बुलंद आवाज

# न्यूज डंका महाराष्ट्र

मुंबई । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरित होणारे दैनिक

आर.एन.आय. रजिस्ट्रेश क्र. : MAHMAR/2022/83413

मुंबई | गुरुवार, ८ ऑक्टोबर २०२६ >> वर्ष ५ >> अंक १५४ >> पाने ६ >> किंमत ५ रुपये | मुख्य संपादक : दिनेश कानजी

संपादकीय

घ्या, काँग्रेसला बॅलेटनेही बुडवले...

>> पान...२

# ‘वी विल डू इट’

## पंतप्रधान मोदींनी 'विकसित भारत' संकल्पाबाबत पुन्हा व्यक्त केला विश्वास

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

### ‘हे होणार नाही’पासून ‘आम्ही करून दाखवू’पर्यंत

**आपल्या २५ वर्षांच्या प्रशासनातील प्रवासाचा उल्लेख करताना पंतप्रधान मोदी यांनी देशातील बदलत्या आत्मविश्वासाकडे लक्ष वेधले. त्यांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी मोठ्या आव्हानांकडे पाहताना “हे होऊ शकत नाही” अशी मानसिकता होती. मात्र आता परिस्थिती बदलली असून, “हे होईल” आणि “आम्ही करून दाखवू” असा विश्वास देशात निर्माण झाला आहे. आव्हाने कायम राहणार आहेत आणि ती वेगवेगळ्या स्वरूपात समोर येत राहतील. मात्र प्रत्येक आव्हानाचा सामना करण्याची क्षमता भारताने निर्माण केली आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. त्यांच्या मते, एखादी गोष्ट शक्य आहे आणि ती आपण पूर्ण करू शकतो, या सामूहिक विश्वासातूनच मोठी स्वप्ने प्रत्यक्षात उतरतात. २०४७ पर्यंत विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी देशाला आणि तेथील जनतेला ‘आम्ही हे करून दाखवू’ या मंत्रासह पुढे जावे लागेल.**



जगभरात युद्धांचे सावट असताना, अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांसमोर आव्हाने उभी असताना आणि एकूणच अस्थिरतेचे वातावरण निर्माण झालेले असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मात्र विकसित भारताच्या संकल्पाचा पुनरुच्चार केला. निराशेच्या या वातावरणात थांबण्याऐवजी आत्मविश्वासाने पुढे जाण्याचा संदेश देत त्यांनी देशवासीयांना ‘वी विल डू इट’ हा नवा मंत्र दिला. “हे होऊ शकत नाही” या मानसिकतेतून बाहेर पडून “हे होईल, आम्ही करून दाखवू” असा आत्मविश्वास निर्माण करण्याचे आवाहन मोदी यांनी केले.

गुजरातच्या मुख्यमंत्रिपदापासून देशाच्या पंतप्रधानपदापर्यंतचा २५ वर्षांचा प्रवास पूर्ण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या विकासाच्या प्रवासातील बदलत्या मानसिकतेवर भर दिला. ७ ऑक्टोबर २००१ रोजी नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर २०१४ मध्ये ते देशाचे पंतप्रधान झाले. २०१४, २०१९ आणि २०२४ या तीन लोकसभा निवडणुकांमध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीला विजय मिळाला. ९ जून २०२४ रोजी मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. अशा प्रकारे ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सरकारच्या प्रमुखपदी त्यांच्या सलग २५ वर्षांचा टप्पा पूर्ण झाला.

### अजूनही मी विद्यार्थीच- पंतप्रधान मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, “माझी शिकण्याची क्षमता कधीही कमी होऊ नये. मी जितके जास्त शिकेन, तितकीच देशासाठी चांगले काम करण्याची माझी क्षमता वाढेल. जेव्हा मी मागे वळून पाहतो, तेव्हा माझे मन कृतज्ञतेने भरून येते. मला काहीतरी शिकवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा आणि प्रत्येक घटनेचा मी आभारी आहे. ज्यांनी मला जिंकवले, त्यांनी मला नम्रता शिकवली. ज्यांनी मला पाडले, त्यांनी मला पुन्हा उठायला शिकवले.” पुढे ते म्हणाले की, शिकण्याची आवड जीवनाचा एक भाग बनली असून आजही मी स्वतःला एक विद्यार्थीच मानतो.”

पंतप्रधान मोदी म्हणाले, “आज सकाळी मी श्री विनायक मंदिराला भेट दिली. मी देशासाठी, १.४ अब्ज भारतीयांसाठी आणि स्वतःसाठी देवाकडे प्रार्थना केली. माझी प्रार्थना आहे की, देवा, मला माझ्या देशासाठी आणखी मोठ्या ऊर्जेने काम करण्याची शक्ती आणि सामर्थ्य दे. आज मी जे काही आहे, जिथे कुठे आहे, माझ्यावर जी काही जबाबदारी आहे, त्यामध्ये जनतेचाच सर्वात मोठा वाटा आहे. माझ्यासाठी जनता म्हणजे देवस्वरूप आहे. लाखो देशवासियांचा विश्वास आणि लाखो कार्यकर्त्यांची मेहनत हीच माझी सर्वात मोठी ताकद आहे. हा २५ वर्षांचा अनुभव ही एक मोठी संपत्ती आहे आणि ही संपत्ती केवळ मोदींची नसून ती देशाची आहे.

---

## सिलचरमध्ये बॅलेट पेपरवरील निवडणुकीतही

# काँग्रेसचा सुपडा साफ

### पालिकेचा दर्जा मिळाल्यानंतर पहिल्याच निवडणुकीत ४२ पैकी ३४ जागा एनडीएने जिंकल्या

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com




### सहा वर्षांनंतर सिलचरला मिळाले महापालिका स्वरूप

**सिलचर नगर मंडळाचे २०२२ मध्ये ४२ प्रभागांच्या महानगरपालिकेत रूपांतर करण्यात आले. मात्र ही महानगरपालिका प्रत्यक्षात जून २०२५ मध्ये कार्यरत झाली. त्यामुळे बराक खोऱ्याचे प्रमुख शहर असलेल्या सिलचरमध्ये तब्बल सहा वर्षे नियमित नागरी संस्था अस्तित्वात नव्हती.**

आपल्या पराभवाचे खापर सातत्याने ईव्हीएमवर फोडणाऱ्या आणि सगळ्या निवडणुका मतपत्रिकांवर घेण्याची मागणी करणाऱ्या काँग्रेसला सिलचरमध्ये मतपत्रिकांवर घेण्यात आलेल्या पालिका निवडणुकीत चांगलाच दणका बसला. आसाममधील सिलचर महानगरपालिकेच्या पहिल्या निवडणुकीत सत्ताधारी भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) मोठे यश मिळाले आहे. एकूण ४२ प्रभागांपैकी एनडीएने तब्बल ३४ जागांवर विजय मिळवला. महत्त्वाचे म्हणजे या निवडणुकीत काँग्रेसला अवघ्या दोन जागा मिळाल्या, तर सहा जागांवर अपक्ष उमेदवार विजयी झाले.

सिलचर महानगर-पालिकेसाठी ३ ऑक्टोबर रोजी ४२ पैकी ४० प्रभागांमध्ये मतदान झाले होते. भाजपचे बिजेंद्र प्रसाद सिंह आणि भक्ती सेन तालुकदार हे अनुक्रमे प्रभाग क्रमांक ९ आणि २० मधून बिनविरोध विजयी झाले होते. दरम्यान, निकालानंतर भाजपने दोन प्रभागांमध्ये फेरमतमोजणीची मागणी केली आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक २९, जिथे अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे, आणि प्रभाग क्रमांक ३०, जिथे काँग्रेस उमेदवार विजयी झाला आहे, यांचा समावेश आहे. भाजपच्या मागणीवर अद्याप निर्णय झालेला नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

निवडणुकीची मतमोजणी सकाळी ८ वाजता सुरू झाली. या निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राऐवजी मतपत्रिकांचा वापर करण्यात आला होता. निकालानंतर आसाम भाजपचे अध्यक्ष दिलीप सैकिया यांनी काँग्रेसवर निशाणा साधला. ते म्हणाले की, मतपत्रिकेद्वारे निवडणूक होऊनही काँग्रेसला जनतेचा पाठिंबा मिळवता आलेला नाही. सैकिया म्हणाले, “काँग्रेस नेहमी ईव्हीएममध्ये छेडछाडीची तक्रार करते. मात्र ही निवडणूक मतपत्रिकेद्वारे झाली आणि तरीही काँग्रेस कुठेच दिसत नाही.

>> अधिक वृत्त...५

---

# बीजगणितीय सिद्धांतासाठी गणितज्ञ महेश काकडेंना रामानुजन पुरस्कार



### बीजगणितीय संख्या सिद्धांत म्हणजे काय?

**सोप्या भाषेत सांगायचे झाले तर संख्या सिद्धांत म्हणजे संख्या आणि त्यांच्या गुणधर्मांचा अभ्यास. मात्र बीजगणितीय संख्या सिद्धांत यापेक्षा पुढे जाऊन संख्यांमागील लपलेल्या रचना आणि नमुने शोधण्याचा प्रयत्न करतो. काकडे यांच्या संशोधनातील महत्त्वाचा भाग इवासावा सिद्धांताशी संबंधित आहे. या सिद्धांतामध्ये संख्यांचा अधिकाधिक गुंतागुंतीच्या गणितीय प्रणालींमध्ये विस्तार केल्यानंतर त्यांच्याशी संबंधित नमुने आणि गुणधर्म कसे बदलतात, याचा अभ्यास केला जातो.**

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

भारतीय गणितज्ञ आणि बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेचे (आयआयएससी) प्राध्यापक महेश काकडे यांना २०२६ चा विकसनशील देशांतील युवा गणितज्ञांसाठीचा रामानुजन पुरस्कार जाहीर झाला आहे. संख्या सिद्धांताच्या क्षेत्रातील महत्त्वपूर्ण संशोधनासाठी त्यांची या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार आंतरराष्ट्रीय सैद्धांतिक भौतिकशास्त्र केंद्र (आयसीटीपी) आणि आंतरराष्ट्रीय गणितीय संघ (आयएमयू) यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जातो. विकसनशील देशांमध्ये कार्यरत राहून उल्लेखनीय संशोधन करणाऱ्या ४५ वर्षांखालील गणितज्ञांना या पुरस्काराने गौरवण्यात येते.

महेश काकडे यांनी बीजगणितीय संख्या सिद्धांत या गणिताच्या अत्यंत गुंतागुंतीच्या क्षेत्रात मूलभूत स्वरूपाचे संशोधन केले आहे. संख्या कशा प्रकारे वागतात, त्यांच्यामध्ये कोणते लपलेले नमुने असतात आणि विविध गणितीय संरचनांमध्ये परस्पर संबंध कसे निर्माण होतात, याचा त्यांच्या संशोधनात सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

काकडे यांनी अशा परिस्थितींमध्ये महत्त्वपूर्ण निष्कर्ष मांडले आहेत, जिथे या गणितीय प्रणालींचे वर्तन सरळ किंवा सहज अंदाज करता येण्यासारखे नसते. त्यांच्या संशोधनामुळे संख्या सिद्धांतातील काही अत्यंत गुंतागुंतीच्या प्रश्नांना समजून घेण्यासाठी गणितज्ञांना नवी दिशा मिळाली आहे.

>> अधिक वृत्त...५

---

# मीरारोडच्या पूनम इस्टेट इमारतीत गरब्यावर बंदी

### बोकडाची कुर्बानी करायलाही घातली होती बंदी

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



मिरा रोडमधील पूनम इस्टेट क्लस्टर-१मध्ये नवरात्रोत्सवाच्या परवानगीवरून वाद निर्माण झाला आहे. नियमांचे पालन करून शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने नवरात्रोत्सव साजरा करण्याची तयारी असतानाही सोसायटीने परवानगी नाकारल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. सोसायटीतील सुमारे १२० कुटुंबांनी ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान गरबा, दांडिया आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी परवानगी मागितली होती. कार्यक्रमासाठी आवश्यक सुरक्षा, स्वच्छता तसेच सोसायटीचे नियम आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याची हमी रहिवाशांनी दिली होती. मात्र, त्यानंतरही कार्यक्रमाला परवानगी नाकारण्यात आल्याने रहिवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे.

पूनम इस्टेट क्लस्टर-१मध्ये सुमारे ६२५ सदनिका असून विविध धर्मांचे नागरिक वास्तव्यास आहेत. २८ सप्टेंबर रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत सामायिक जागेत अशा प्रकारचे सामुदायिक कार्यक्रम आयोजित करण्यास परवानगी न देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सोसायटीकडून सांगण्यात आले. मात्र, रहिवाशांकडून सर्व नियम आणि अटी मान्य करण्याची तयारी दर्शविण्यात आली असतानाही त्यांची मागणी विचारात न घेता निर्णय घेण्यात आल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे.

>> अधिक वृत्त...५

---

## डिटर्जंटयुक्त दूध, रसायनमिश्रित केळी जप्त



महाराष्ट्रात अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई केली आहे. मुंबईत अन्न सुरक्षा, स्वच्छता, अन्नसाठवणूक आणि कागदपत्रांशी संबंधित त्रुटी आढळल्यानंतर आठ खाद्यआस्थापनांचे परवाने निलंबित, तर आणखी तीन आस्थापनांची नोंदणी प्रमाणपत्रे निलंबित करण्यात आली आहेत. त्याचबरोबर नवी मुंबईत १,३९४ किलो रासायनिक पद्धतीने पिकवलेली केळी जप्त करण्यात आली असून, सोलापूर जिल्ह्यात डिटर्जंटची भेसळ आढळलेले १६,७३० लिटर दूध नष्ट करण्यात आले.

>> सविस्तर वृत्त...३

---

# जिहादींचा फ्रान्स काबीज करण्याचा प्रयत्न

### ट्रम्प यांचा स्थलांतराकडे इशारा

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



**फ्रान्समधील परिस्थितीवर भाष्य केले. फ्रान्समध्ये जे काही घडत आहे ते ‘अनियंत्रित मोठ्या प्रमाणातील स्थलांतरा’चा परिणाम असल्याचे त्यांनी म्हटले. तसेच, हे आंदोलन शाळांशी संबंधित नसून ‘एकेकाळी महान असलेला फ्रान्स इस्लामला ताब्यात घ्यायचा आहे’, असा दावा त्यांनी केला.**

✦ डोनाल्ड ट्रम्प

फ्रान्समध्ये शिक्षण व्यवस्थेतील अपुऱ्या सुविधा, शिक्षकांची कमतरता आणि शाळांच्या दुरवस्थेविरोधात सुरू असलेल्या मोठ्या विद्यार्थी आंदोलनावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. फ्रान्समधील आंदोलनाचा संबंध शिक्षण व्यवस्थेतील समस्यांपेक्षा अनियंत्रित स्थलांतर आणि इस्लामच्या वाढत्या प्रभावाशी असल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे. फ्रान्समध्ये अडीच लाखांहून अधिक लोक रस्त्यावर उतरले असतानाच ट्रम्प यांनी ही टिप्पणी केली.

ट्रम्प यांनी आपल्या सोशल मीडिया खात्यावर पोस्ट करत फ्रान्समधील परिस्थितीवर भाष्य केले. फ्रान्समध्ये जे काही घडत आहे ते ‘अनियंत्रित मोठ्या प्रमाणातील स्थलांतरा’चा परिणाम असल्याचे त्यांनी म्हटले. तसेच, हे आंदोलन शाळांशी संबंधित नसून ‘एकेकाळी महान असलेला फ्रान्स इस्लामला ताब्यात घ्यायचा आहे’, असा दावा त्यांनी केला.

फ्रान्समध्ये सप्टेंबरपासून उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले आहे. शाळांमधील अपुऱ्या सुविधा, जुन्या आणि खराब इमारती, वर्गांमधील वाढती गर्दी, शिक्षकांची कमतरता आणि शिक्षणासाठी पुरेशा निधीअभावी विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे. सुरुवातीला पॅरिसमधील गरीब भागांत सुरू झालेले हे आंदोलन हळूहळू देशभर पसरले. सरकारी आकडेवारीनुसार, देशभरात सुमारे २.६६ लाख लोक रस्त्यावर उतरले, तर आंदोलकांनी हा आकडा सुमारे ४.५ लाख असल्याचा दावा केला. विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि विविध संघटनांनी आंदोलनात सहभाग घेतला.

अनेक ठिकाणी आंदोलने शांततेत झाली असली तरी काही शहरांमध्ये परिस्थिती चिघळली. स्ट्रासबर्ग, लियॉन आणि रेनेस येथे आंदोलकांनी आग लावणे आणि पोलिसांवर वस्तू फेकण्याच्या घटना घडल्या. त्यानंतर पोलिसांनी अश्रुधुराचा वापर केला. आंदोलनाच्या काळात मोठ्या प्रमाणावर अटक करण्यात आली असून, अनेक विद्यार्थी आणि पोलीस जखमी झाले आहेत.

---

### धाडसाचा गौरव करण्यासाठी घेतला निर्णय

# अमेरिकन प्रतिनिधी सभेकडून स्मित माछरसाठी कौतुकाचा ठराव

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



दुबईहून तेल अवीवला जाणाऱ्या फ्लायदुबईच्या एफझेड१०७३ विमानात झालेल्या गंभीर हल्ल्याच्या प्रसंगी प्रवाशांचे प्राण वाचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे भारतीय वैमानिक कॅप्टन स्मित माछर यांच्या धाडसाचा अमेरिकेच्या प्रतिनिधी सभेने गौरव केला आहे. कॅप्टन स्मित यांच्या शौर्याचे कौतुक करणारा ठराव अमेरिकन संसदेच्या कनिष्ठ सभागृहात मंजूर करण्यात आला.

या ठरावात कॅप्टन मच्छर यांच्यासोबतच राखीव वैमानिक, केबिन क्रू आणि संकटाच्या परिस्थितीत धैर्य दाखवणाऱ्या प्रवाशांचेही कौतुक करण्यात आले. या सर्वांनी मिळून विमानाचे सुरक्षित लँडिंग करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

हा ठराव अमेरिकी खासदार जोश गॉटहायमर, डॉन बेकन आणि मायकेल मॅककॉल यांनी मांडला.

ठरावात प्रतिनिधी सभेने कॅप्टन स्मित मच्छर यांच्या असामान्य धैर्य आणि कर्तव्यनिष्ठेचा सन्मान केल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच विमानाचे कॉकपिट सुरक्षित करण्यासाठी आणि विमानाचे सुरक्षित लँडिंग सुनिश्चित करण्यासाठी मदत करणाऱ्या राखीव वैमानिक, केबिन क्रू आणि प्रवाशांच्या धाडसाचेही कौतुक करण्यात आले.

अमेरिकी प्रतिनिधी सभेने कॅप्टन स्मित तसेच या घटनेत जखमी झालेल्या इतर व्यक्तींना लवकर आणि पूर्णपणे बरे होण्यासाठी शुभेच्छाही दिल्या.

ठरावात फ्लायदुबईच्या एफझेड१०७३ विमानाच्या कॉकपिटमध्ये कॅप्टन माछर यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यात आला आहे.

या घटनेला आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतुकीच्या सुरक्षेसाठी गंभीर धोका आणि दहशतवादी घटना म्हणून संबोधण्यात आले आहे. तसेच या प्रकरणाची जलद आणि सखोल चौकशी करण्याची मागणी सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीच्या सरकारांकडे करण्यात आली आहे.

या चौकशीशी संबंधित संपूर्ण माहिती अमेरिका आणि इस्त्रायलसोबतही सामायिक करण्यात यावी, असे ठरावात नमूद करण्यात आले आहे.

फ्लायदुबईचे एफझेड१०७३ विमान ३० सप्टेंबर रोजी दुबईहून तेल अवीवच्या दिशेने रवाना झाले होते. विमान हवेत असताना कॉकपिटमध्ये कॅप्टन स्मित यांच्यावर हल्ला झाला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले.

घटनेनंतर काही प्रवासी कॉकपिटमध्ये पोहोचले आणि त्यांनी हल्लेखोराला नियंत्रणात आणण्यासाठी मदत केली. परिस्थिती गंभीर असल्याने विमानाचे आपत्कालीन लँडिंग सौदी अरेबियातील ताबुक येथे करण्यात आले.

तिथे कॅप्टन स्मित यांना प्राथमिक उपचार आणि वैद्यकीय मदत देण्यात आली. त्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी संयुक्त अरब अमिरातीमध्ये नेण्यात आले.